# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे
# शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा
# जी.सी.सी. मे-२०२५

**(मॅन्युअल टंकलेखन)**

**( व्दितीय सत्र - ऑक्टोंबर २०२४ ते मार्च २०२५)**

**GOVERNMENT COMMERCIAL CERTIFICATE EXAMINATION**
**MAY - 2025 (MANUAL TYPING)**
**(SECOND SEMI – OCT 2024 TO MARCH 2025)**

## अधिसूचना
## व
## ऑनलाईन
## आवेदनपत्र स्वीकृती
## कार्यक्रम


**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे**

व्दारा महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
भांबुर्डा,शिवाजीनगर,पुणे ४११००४

**दूरध्वनी क्रमांक : ०२०-२९७०९३९६/२९७०९६१७**

**E-mail – mscegcctbc@gmail.com**
**Website : www.mscepune.in**

## महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतील शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा

## (जी.सी.सी) मे - २०२५

# ( व्दितीय सत्र - ऑक्टोंबर २०२४ ते मार्च २०२५)

## परीक्षेशी संबंधित अधिकारी

| अ. क्र. | नांव | पद | मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | श्री. महेश पालकर | अध्यक्ष | ०२०-२९७०९३९६ |
| २. | श्रीम. अनुराधा ओक | आयुक्त | ९८२२९७९७३० |
| ३. | श्री.संजयकुमार राठोड | उपायुक्त | ९६५७३७८१३७ |
| ४. | श्रीम.मंगल वाव्हळ | सहाय्यक आयुक्त | ९८५०७३२९८४ |
| ५. | श्रीम. अर्चना सरदार | अधिक्षक | ९७६६५३४४२० |
| **४.** | श्रीमती संगीता चव्हाण | लेखाधिकारी | ०२०-२९७०९३९६ |
| **ऑनलाईन माहिती भरताना काही तांत्रिक अडचणी आल्यास त्याकरीता ०२०-२९७०९३९६/ २९७०९६१७ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.** | | | |

## महत्त्वाचे

१. ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याच्या प्रक्रियेत महत्वाचे बदल करण्यात आले आहेत. अधिसूचनेचे व संकेतस्थळावरील सर्व सूचनांचे काळजीपूर्वक वाचन करावे.

२. कृतीओघ तक्त्याचे (Flowchart) अवलोकन करूनच आवेदनपत्रे भरावीत.

३. संस्था नुतनीकरण प्रत, संस्थाचालकाचे हमीपत्र, संस्थाचालकाचे प्रतिज्ञापत्र आणि परीक्षक /समीक्षक/प्रपाठ्यावाचक संमतीपत्र ऑनलाईन पध्दतीने भरल्याशिवाय विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे भरता येणार नाहीत.

४. आवेनदनपत्र भरताना विद्यार्थ्याचे नाव, फोटो व सहीबाबत कोणत्याही प्रकारच्या चुका होणार नाहीत याची दक्षता विद्यार्थ्यांनी व संस्थाचालकांनी घ्यावी.

५. आवेदनपत्रे भरल्यानंतर ऑनलाईन एकत्रित शुल्क भरण्यासाठी संस्था लॉगिनव्दारे स्वतंत्र टॅब (Make Payment) दिला आहे. ऑनलाईन बँकिंग, डेबीट किंवा क्रेडिट कार्डाव्दारे विहित मुदतीत शुल्क भरण्याची दक्षता घ्यावी.
(चलन प्रिंट काढून बँकेत जाऊन रक्कम भरण्याचा पर्याय उपलब्ध नाही.)

**परीक्षा प्राधान्य :**

जा. क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/अधिसूचना/मे-२०२५/८७६
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
व्दारा, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर,पुणे-४
दिनांक : ०३ /०३/२०२५.

**प्रति,**

**संस्थाचालक,**
**सर्व शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन संस्था,**
**महाराष्ट्र व गोवा राज्य.**

**विषय :- शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा मे -२०२५ (व्दितीय सत्र - ऑक्टो २०२४ ते मार्च २०२५) अधिसूचना व ऑनलाईन आवेदनपत्र स्वीकृती सुचना.**

राज्यातील शासन मान्यता प्राप्त टंकलेखन संस्थांमधील **(व्दितीय सत्र - ऑक्टो २०२४ ते मार्च २०२५)** नियमित विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत मे-२०२५ मध्ये शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (टंकलेखन) **जिल्हास्तरावर** घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेस बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकडून त्यांच्या टंकलेखन संस्थेमार्फत विषय व गतीनिहाय स्वतंत्र आवेदनपत्र ऑनलाईन मागविण्यात येत आहेत.

**सदरील सत्रातील टंकलेखन विषयाच्या परीक्षा मे - २०२५ या कालावधी दरम्यान घेण्यात येतील.**

**अ) परीक्षेस पात्र होण्यासाठीचे निकष :**

१.उमेदवार शासनमान्य शाळेतून किमान १० वी उत्तीर्ण असावा.
२.शासनमान्य टंकलेखन/लघुलेखन संस्थेत आठवड्यात किमान ४ तासांप्रमाणे परीक्षेच्या तारखेपूर्वी ४ महिने किंवा कार्यालयीन ८० तास नियमित विद्यार्थी म्हणून प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे. (कार्यालयीन तास ४५ मिनिटांचा असतो.)
३.संबंधित संस्थेमार्फत चालू सत्रासाठी उमेदवाराने नोंदणी (registeration) केलेली असावी.
४.उमेदवाराची प्रवेशित सत्रातील उपस्थिती ८०% असणेआवश्यक आहे.

**आ) शुल्कः-**

१. **परीक्षा शुल्क** :- **टंकलेखन** रु. ५००/- प्रति विषय प्रति विद्यार्थी.
२. **विलंब शुल्क** :- रु.५०० + रु. १००/- प्रति विषय प्रति विद्यार्थी.
३. **अतिविलंब शुल्क** :- रु.५०० + रु. १०० + रू ५०/- (प्रति विद्यार्थी, प्रति विषय )

**इ) शुल्क भरण्याची पध्दत** :-

१.संस्थेने सर्व परीक्षार्थ्यांचे परीक्षा शुल्क परिषदेच्या संकेत स्थळावर देण्यात आलेल्या ऑनलाईन पध्दतीने (ऑनलाईन बँकिंग, डेबीट किंवा क्रेडिट कार्डव्दारे) जमा करावे. परीक्षार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे भरल्यानंतर ऑनलाईन शुल्क भरण्याचा पर्याय उपलब्ध होईल. विहित पध्दतीने ऑनलाईन शुल्क भरल्यानंतर त्याची प्रिंट घ्यावी. प्रिंटच्या पाठीमागे संस्थेचे नाव व संस्था कोड क्रमांकाचा शिक्का उमटवून ती पावती दप्तरी जतन करून ठेवावी.

**ई) परीक्षेची ऑनलाईन आवेदनपत्रे स्विकृतीचा कार्यक्रम :-**

**I.** **व्दितीय सत्र - ऑक्टो २०२४ ते मार्च २०२५** या सत्रासाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांचीच आवेदनपत्र भरता येतील.
**II.** गुणपडताळणीसाठी परिषदेकडे अर्ज केलेल्या अनुत्तीर्ण परीक्षार्थ्यांच्या गुणपडताळणीचा निकाल अप्राप्त असेल तर गुणपडताळणीच्या निकालाची वाट न पाहता विहित मुदतीतच पुनर्परीक्षार्थी म्हणून ऑनलाईन आवेदनपत्र भरावे लागेल. त्यासाठी स्वतंत्र कालावधी दिला जाणार नाही.
**III.** कोणत्याही कारणामुळे या पूर्वीच्या परीक्षेचा निकाल राखीव असल्यास राखीव निकालाची प्रतिक्षा न करता विहित मुदतीतच अशा विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्र पुनर्परीक्षार्थी म्हणून भरता येईल. राखीव निकाल उशीरा प्राप्त झाला, या सबबीखाली स्वतंत्र कालावधी मिळणार नाही.
**IV.** मागील परीक्षांमधील गैरप्रकार प्रकरणी चालू (येणाऱ्या) परीक्षेस बसण्यास प्रतिबंध (डिबार) केलेल्या परीक्षार्थ्यांचे आवेदनपत्र भरू नये. त्याबाबतची खात्री संस्थाचालकांनी करावी. अशा विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र संस्थाचालकांनी भरल्यास सदर संस्थेची हि कृती गंभीर व नियमबाह्य समजणेत येईल.
**V.** विहीत मुदतीनंतर नियमित शुल्क भरल्यास विलंब शुल्क / अतिविलंब शुल्क लागू होईल.

उपरोक्त विषयानुसार शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (GCC) माहे मे - २०२५ **(व्दितीय सत्र - ऑक्टो २०२४ ते मार्च २०२५)** या परीक्षेसाठी परीक्षार्थ्यांची नोंदणी शुल्कासह आवेदनपत्र भरणेकरीता दि.०३/०३/२०२५ ते दि.२५/०३/२०२५ या कालावधीत लिंक देण्यात येत आहे. खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार विलंब व अतिविलंब शुल्क आकारून आवेदनपत्र भरता येतील.

| अ.क्र. | तपशील | कालावधी | शुल्क आकारणी |
|---|---|---|---|
| १. | परीक्षेच्या अधिसूचनेपासून | २३ दिवस | नियमित शुल्क |
| २. | नियमित शुल्काच्या मुदतीनंतर विलंब शुल्कासह आवेदनपत्र भरणे. | ०२ दिवस | नियमित शुल्क रु.५००/- + विलंब शुल्क रु.१००/- प्रति विषय, प्रति परीक्षार्थी |
| ३. | विलंब शुल्काच्या मुदतीनंतर अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्र भरणे. | ०२ दिवस | नियमित शुल्क रु.५००/- + विलंब शुल्क रु.१००/- + अतिविलंब शुल्क रु.५०/- |

सदर लिंक कालावधीत परीक्षार्थ्यांची आवेदनपत्र भरलेनंतर उपरोक्त नमूद परीक्षा व त्यापुढे घेतल्या जाणाऱ्या पुढील सर्व परीक्षांमधील आवेदनपत्रातील दुरूस्त्या जसे परीक्षार्थ्यांचे स्वतःचे नाव, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, विषय बदल, फोटो बदल करणेसाठी खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार ऑनलाईन दंड आकारणी करून दुरूस्ती करता येईल.

**टिप : उपरोक्त ठरावानुसार बॅच बदल कोणत्याही परिस्थितीत मान्य करता येत नाही.**

| अ.क्र. | तपशिल | कालावधी | शुल्क आकारणी |
|---|---|---|---|
| १. | परीक्षेच्या अधिसूचनेपासून २१ दिवसांपर्यंत दुरूस्ती लिंक सुरू राहिल. | २३ दिवस | विनाशुल्क |
| २. | प्रवेशपत्र निर्गमित झाल्यापासून परीक्षेपूर्वी पर्यंत | परीक्षेपूर्वी पर्यंत | रु.२००/- (प्रति परीक्षार्थी, प्रति विषय) ऑनलाईन पध्दतीने. |

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे दि.१९/१०/२०१९ चे परीपत्रकान्वये परीक्षेनंतर संस्थाचालकांनी परीक्षार्थ्याचे नाव, वडिलांचे / पतीचे नाव, आडनाव, आईचे नावाचे स्पेलिंग दुरूस्त्या ह्या प्रस्तावास लागणारी कागदपत्रे पूर्ण केल्यानंतरच दुरूस्त्या करून देण्यात येतील. सदर प्रस्तावानुसार स्पेलिंग दुरूस्तीमुळे परीक्षार्थ्याच्या पूर्ण नावात, वडिलांच्या / पतीच्या नावात, आडनावात, आईच्या नावात पूर्ण बदल होत असल्यास अशा दुरूस्त्या करून दिल्या जाणार नाहीत.

- **परीक्षेची ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे स्विकृती :-**

| अ.क्र. | कालावधी | शुल्क प्रकार | शुल्क रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १. | दि.०३/०३/२०२५ ते दि.२५/०३/२०२५ | परीक्षार्थ्यांचे नियमित शुल्कासह आवेदनपत्र भरणे. (२३ दिवस) | टंकलेखन रु.५००/- (प्रति विषय, प्रति परीक्षार्थी) |
| २. | दि.२६/०३/२०२५ ते दि.२७/०३/२०२५ | परीक्षार्थ्यांचे नियमित व विलंब शुल्कासह आवेदनपत्र भरणे. (०२ दिवस) | टंकलेखन रु.५००/- रु.१००/- (प्रति विषय, प्रति परीक्षार्थी) |
| ३. | दि.२८/०३/२०२५ ते दि.२९/०३/२०२५ | परीक्षार्थ्यांचे नियमित, विलंब व अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्र भरणे. (०२ दिवस) | टंकलेखन रु.५००/- + रु.१००/(प्रति विषय, प्रति विद्यार्थी) + रु.५०/- |

**टिप :-** संस्थांनी उपरोक्त वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी. ऑनलाईन प्रक्रियेमुळे उपरोक्त कोणत्याही टप्प्यावर विलंब होता कामा नये.

**टिप :-** ऑनलाईन आवेदनपत्राची एक प्रिंट काढुन परीक्षार्थ्यांची स्वाक्षरी व संस्थेच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह संबंधित संस्थेने आपल्या दप्तरी जतन करून ठेवावी. आवेदनपत्रांच्या प्रिंट आऊटस् (हार्ड कॉपीज्) परिषदेकडे पाठविण्याची आवश्यकता नाही.

**ऊ) <u>आवेदनपत्राची उपलब्धता :-</u>**

आवेदनपत्रे परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरावयाची आहेत. सदरचे आवेदनपत्र परिषदेच्या संकेतस्थळावर **दिनांक ०३/०३/२०२५ पासून** उपलब्ध होईल. इतर कोणत्याही प्रकारे आवेदनपत्र स्विकारली जाणार नाहीत.

**अत्यंत महत्वाचे :-**

**शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे शासनपरिपत्रक क्र:- संकिर्ण-२०१६/प्र.क्र.११/एसडी-२, दिनांक २४ एप्रिल २०१७ नुसार उमेदवार पूर्वअट पूर्तता करत आहे याची खात्री करून घ्यावी. ज्या उमेदवारास संस्थेत प्रवेश दिला आहे त्याच उमेदवाराचे आवेदनपत्र भरता येईल.**

## ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याचा कृतीओघ तक्ता (Flow Chart)

www.mscepune.in वेबसाईटला भेट देणे.

↓

GCC - TBC Examination या Tab वर क्लिक करा.

↓

ID व Password द्वारे Login करा.

↓

G.C.C Tab वर क्लिक करणे.

↓

वाणिज्य टायपिंग नुतनीकरण आदेश Upload करणे.

↓

G.C.C Application form वर क्लिक करणे.

↓

परीक्षार्थ्याची सर्व माहिती अचूक भरल्याची पुन्हा पुन्हा खात्री करून Save / Submit बटनावर क्लिक करावे.

↓

भरलेल्या आवेदनपत्राची प्रिंट काढून त्यावर परीक्षार्थी व संस्थाचालकांनी स्वाक्षरी करून दप्तरी जपून ठेवावी.

↓

G.C.C Online Payment Tab वर क्लिक करून विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने संस्था लॉगीनव्दारे परीक्षा शुल्क भरावे.

## ए) ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याबाबत सूचना :-

### A. सर्वसाधारण सूचना :-

१. ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याकरीता प्रथमत: परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

२. सदर संकेत स्थळावरील G.C.C. Examination वर Click करावे.त्यानंतर स्क्रीनवर Login चा बॉक्स दिसेल त्यामध्ये दिलेली माहिती भरावी व Login करावे.

३. ऑनलाईन आवेदनपत्र भरताना चुका होऊ नयेत म्हणून संस्थाचालकांनी/प्राचार्यांनी परीक्षार्थ्यांच्या उपस्थितीतच ऑनलाईन आवेदनपत्र अचूक भरावे.

४. परीक्षा परिषदेकडून घेण्यात येणाऱ्या जीसीसी, जीसीसी-टिबीसी या परीक्षांची आवेदनपत्रे भरल्यानंतर परिषदेकडून त्यानुसारच प्रवेशपत्र निर्गमित केली जातात. तथापि परीक्षेनंतर नावांमधील स्पेलिंग दुरूस्त्या , पूर्ण नाव दुरूस्तीचे तसेच विषय बदलाबाबतचे प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर होतात. याचाच अर्थ संस्थाचालकाकडून आवेदनपत्र भरताना पूर्णपणे दक्षता घेतली जात नाही, असे निदर्शनास येते.

५. वरील प्रकारच्या चुका होऊ नयेत यासाठी संस्थाचालकांनी आवेदनपत्र भरताना परीक्षार्थ्यांची आवश्यक ती माहिती परीक्षार्थ्यांच्या मूळ कागदपत्रावरून (शाळा सोडल्याचा दाखला/बोनाफाईड, १०/१२ वी गुणपत्रक/प्रमाणपत्र) पडताळणी करून आवेदनपत्रात भरावी.

६. **परीक्षार्थ्यांचे आवेदनपत्र भरताना संस्थाचालकांनी परीक्षार्थ्यांचा ई-मेल आयडी व व्हाटसअॅप नंबर नमूद करावा. संस्थाचालकांनी स्वत:ची माहिती भरु नये.**

७. **परीक्षार्थी टंकलेखनाच्या अनेक विषयासाठी परीक्षेस प्रविष्ठ होणार असल्यास संबंधित परीक्षार्थ्याचे एकच आवेदनपत्र भरण्यासाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तथापि, लघुलेखन विषयासाठी विषयनिहाय स्वतंत्र आवेदनपत्र भरावे.**

८. **आवेदनपत्रावर सही सोबतचा फोटो हा पासपोर्ट आकाराचा रंगीत आणि नुकताच काढलेला असावा. जुना, शालेय, बालपणीचा चालणार नाही. पासपोर्ट आकाराचा फोटो आणि वेब कॅमेराने काढलेल्या फोटोमध्ये तफावत आढळता कामा नये.**

९. **फोटो काढलेल्या ठिकाणी म्हणजेच लोकेशन तपासण्याच्यादृष्टीने वेब कॅमेराने काढलेला फोटो मान्यता मिळालेल्या स्वत:च्या संस्थेच्या कार्यालयात काढलेलाच असावा. इतरत्र काढलेला चालणार नाही. वेब फोटो अतिशय स्वच्छ प्रकाशात काढलेला, स्पष्ट दिसेल असाच असावा.**

१०. **आवेदनपत्र भरणे सुरु असताना पूर्ण कालावधीत ऐडिट लिंक सुरु असते. आवेदनपत्र भरताना स्पेलिंगमध्ये चूक झाली असेल तर पुन्हा दुरुस्ती करता येते. आवेदनपत्र भरण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी सर्व संस्थाचालकांनी भरलेल्या आवेदनपत्रातील विषय व पूर्ण नाव तपासून पहावी. आपल्या चुकीमुळे विद्यार्थ्यांची परीक्षेची संधी वाया जाऊ नये,याची नोंद घ्यावी.**

११. संपूर्ण माहिती पुन्हा वाचून खात्री केल्यानंतर Submit या बटनावर Click करावे. **Submit केलेल्या आवेदनपत्राची प्रिंट काढून ठेवावी. त्यावर विद्यार्थी व संस्थाचालकांनी स्वाक्षरी करून नाव व संस्था कोड लिहावा व आपल्या दप्तरी जपून ठेवावी.**

१२. आपल्या संस्थेतील सर्व परीक्षार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्र भरून झाल्यानंतर स्क्रिनवरील Pay Online वर Click करून ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क विहित मुदतीत भरावे. ऑनलाईन पावतीची प्रिंट घ्यावी.

### B. मुद्देनिहाय सूचना :-

- **Batch - परीक्षा कालावधी टंकलेखन ०३दिवस आहे. परीक्षेची बॅच कोणत्याही कारणामुळे बदलून देण्यात येणार नाही, त्यामुळे अधिसूचनेतील वेळापत्रकानुसार आपणास हवी असलेली योग्य ती बॅच निवडावी.**

- **Present Days -** प्रवेश घेतल्यापासून ते अर्ज सबमिट करेपर्यंत उपस्थित दिवस लिहावेत.

- **Handicapped** - ४०% व त्यापेक्षा जास्त दिव्यांग असल्याचे सिव्हिल सर्जनचे प्रमाणपत्र असल्यास Yes वर Click करावे. नसल्यास No वर Click करावे. मदतनीस पाहिजे असल्यास (अंध उमेदवारांबाबत) मदतनीसाची अचूक माहिती भरावी.

**ऐ) संस्थाचालक व परीक्षार्थी यांच्यासाठी महत्वाच्या बाबी :-**

१. आवेदनपत्र भरण्यासाठी दिलेला व आवेदनपत्रामध्ये दुरूस्ती करणेसाठी दिलेला कालावधी पाहून योग्य त्या दुरूस्त्या कराव्यात. परीक्षार्थ्यांची आवेदनपत्रे भरून झालेनंतर व परीक्षा शुल्क भरलेनंतर नियमित शुल्काच्या कालावधीत कोणतीही दुरूस्ती करता येणार नाही.

२. परीक्षेपूर्वी अंदाजे ८ दिवस अगोदर पात्र उमेदवारांची **प्रवेशपत्रे (हॉल तिकीट)** संस्थांना परिषदेच्या संकेतस्थळावर संस्थांच्या लॉगिनमध्ये ऑनलाईन दिली जातील. त्यानुसार संस्थांनी आपल्या संस्थेतील सर्व परीक्षार्थ्यांच्या प्रवेशपत्रांची प्रिंट काढून परीक्षेपूर्वी परीक्षार्थ्यांना वितरीत करावीत.

३. परीक्षेची बॅच कोणत्याही कारणामुळे बदलून देण्यात येणार नाही. विशेष परिस्थितीत बॅच बदलाबाबत परीक्षा परिषदेच्या स्तरावरून कार्यवाही करण्यात येईल. **अ) विद्यार्थी संख्येनुसार बॅचमध्ये बदल करण्याची मुभा महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद या कार्यालयास असेल.**

४. **परीक्षार्थीने भरलेले परीक्षा शुल्क, विलंब शुल्क व अतिविलंब शुल्क कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही याची परीक्षार्थीनी व संस्थाचालकांनी नोंद घ्यावी. त्यामुळे अतिरिक्त शुल्क भरण्यात येवू नये.**

५. **प्रवेशपत्रावर विद्यार्थ्याचा अद्यावत पासपोर्ट आकाराचा रंगीत फोटो चिकटावून फोटोवर संस्थाचालकांनी संस्थेचा अर्धा शिक्का व स्वाक्षरीसह विद्यार्थ्यांना प्रवेशपत्र वितरित करणे बंधनकारक राहील.** प्रवेशपत्र वितरित झाल्यानंतर पत्रव्यवहार करताना परीक्षार्थ्यांच्या आवेदनपत्राची छायांकित प्रत पाठविणे आवश्यक आहे. अन्यथा अशा पत्रव्यवहाराचा विचार केला जाणार नाही. त्यासाठी प्रत्येक आवेदनपत्राची प्रिंट काढून ठेवावी.

६. **अंध विद्यार्थ्यांबाबत :-** अंध विद्यार्थ्यांना इंग्रजी टंकलेखन ३० श.प्र.मि. परीक्षेस मदतनीस (सनेत्र वाचक) घेऊन बसण्यासाठी शासनाने शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र: बीजीई २००१/९३९७५/(१९०/२००१)/साशि-१, दि.१०/१०/२००१ नुसार मान्यता दिलेली आहे. तसेच अंध विद्यार्थ्यांना सनेत्र वाचकाने (मदतनीस) वाक्य, शब्द वाचल्यानंतर ते टंकलिखित करण्यास उशीर लागण्याची शक्यता लक्षात घेऊन टंकलेखन परीक्षेच्या विभाग दोनसाठी (गती उतारा) ७ मिनिटां ऐवजी १० मिनीटे अतिरिक्त वेळ देण्यास शासनाने शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र.बीजीई २००१/९३९७५/(१९०/२००१)/साशि-१, दि.३१ डिसेंबर २००१ नुसार मान्यता दिलेली आहे.

७. **दिव्यांग विद्यार्थ्यांबाबत :-** ४० % टक्के किंवा त्याहुन अधिक कायम स्वरुपाचे दिव्यांगत्व परीक्षार्थी व जिल्हा शल्य चिकित्सकांनी (जिल्हा सिव्हिल सर्जन) तसे प्रमाणित केलेले असल्यास सदर विद्यार्थ्यांना ३० श.प्र.मि.गतीची परीक्षा, या टंकलेखनाच्या परीक्षेतील गती उताऱ्यासाठी सर्व दिव्यांग उमेदवारास ७ मिनिटां ऐवजी १० मिनिटे म्हणतेच अधिक ३ मिनिटांची सवलत देण्यास शासनाने, शालेय शिक्षण विभाग, शासन नर्णय क्र.:परीक्षा-२०१५/प्र.क्र.२७२/एसडी-२, दि.२०ऑक्टोबर, २०१६ नुसार मान्यता दिलेली आहे.

८. आवेदनपत्रात खोटी माहिती देणे, आवेदनपत्रासोबतच्या दस्तऐवजात खाडाखोड करून सादर करणे या कारणांमुळे उमेदवार परीक्षेसाठी कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरेल व त्याची/तिची सदर परीक्षेची संपादणूक रद्द होईल, तसेच संबंधित संस्थेचा सांकेतांक रद्द करण्यात येईल.

९. **संस्थाचालक व प्राचार्य यांनी आवेदनपत्रावरील Submit या बटनावर क्लिक करण्यापूर्वी आवेदनपत्रामधील आवश्यक असलेले सर्व रकाने बरोबर भरले असल्याची खात्री करावी.**

१०. **संस्थाचालकांनी संस्था नुतनीकरण न करता विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ करू नयेत. विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ केल्याचे निदर्शनास आल्यास आपल्या संस्थेचा सांकेतांक रद्द करण्यात येईल.**

११. **परीक्षार्थ्याचे एका विषयासाठी एकच आवेदनपत्र भरावे. एकाच विषयाची एकापेक्षा जास्त आवेदनपत्रे भरल्यास त्या विषयाची सर्व आवेदनपत्रे रद्द करण्यात येतील, त्यामुळे याबाबत गांभीर्याने नोंद घ्यावी. परीक्षार्थीनी एकाच विषयाची एकापेक्षा जास्त आवेदनपत्रे त्याच किंवा इतर संस्थेमधून भरली नसल्याची संस्थाचालकांनी खात्री करावी. तसे आढळल्यास संस्थेचा सांकेतांक रद्द केला जाईल.**

१२. **आवश्यक पूर्वअट पूर्ततेबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**
**(संदर्भ - शासनपरिपत्रक क्र:- संकिर्ण-२०१६/प्र.क्र.११/एसडी-२, दिनांक २४ एप्रिल २०१७)**

| SR. NO. | NAME OF THE SUBJECT & SPEED | SUBJECT CODE | PRECONDITIONS REQUIRED |
|---|---|---|---|
| 1 | ENG. T/W 30 | 10 | टंकलेखन पात्रता पुर्वअट नाही. |
| 2 | ENG. T/W 40 | 11 | टंकलेखन पात्रता पुर्वअट नाही. |
| 3 | ENG. T/W 50 | 12 | ENG. T/W 30 |
| 4 | ENG. T/W 60 | 13 | ENG. T/W 30 |
| 5 | MARATHI T/W 30 | 21 | टंकलेखन पात्रता पुर्वअट नाही. |
| 6 | MARATHI T/W 40 | 22 | टंकलेखन पात्रता पुर्वअट नाही. |
| 7 | HINDI T/W 30 | 31 | टंकलेखन पात्रता पुर्वअट नाही. |
| 8 | HINDI T/W 40 | 32 | टंकलेखन पात्रता पुर्वअट नाही. |

**१) उमेदवार एकाच वेळी इंग्रजी/मराठी/हिंदी टंकलेखन ३० व ४० श.प्र.मि.टंकलेखन परीक्षेसाठी बसू शकेल.**
**२) उमेदवाराने शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून इंग्रजी/मराठी/हिंदी टंकलेखन अथवा लघुलेखन परीक्षा उत्तीर्ण असल्यास त्यास उच्चस्तर श्रेणी परीक्षेस बसता येईल.**

१३. पूर्वअटींच्या संदर्भात जोडलेल्या प्रमाणपत्रामधील व आवेदनपत्रामधील नावांत बदल असेल तर नाव बदलाबाबत पुढील कागदपत्रांपैकी संबंधित विद्यार्थ्यांनी स्व-साक्षांकित केलेला कोणताही एक पुरावा आवेदनपत्रासोबतच्या कागदपत्रांमध्ये जोडावा.
(अ) राजपत्रामधील नाव बदलाची नोंद.
(ब) न्याय दंडाधिकारी/न्यायालय यांनी नाव बदलासाठी दिलेले आदेश.
(क) समक्ष प्राधिकाऱ्याने (विवाह नोंदणी रजिस्ट्रार) विवाह नोंदणी केल्याचा दाखला.

१४. **संस्थाचालकाने कोणत्याही अनधिकृत टंकलेखन संस्थेच्या विद्यार्थ्याचे आवेनदनपत्र आपल्या संस्थेमार्फत भरू नयेत. तसे निदर्शनास आल्यास आपल्या संस्थेची शासन मान्यता काढून घेण्याबाबतची तसेच सांकेतांक रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.**

**(स्वाक्षरीत)**
**(अनुराधा ओक)**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-४.**

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव :-**

**१.** विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व महाराष्ट्र राज्य.
**२.** शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सर्व जिल्हा परिषद, महाराष्ट्र राज्य.
**३.** शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई (उत्तर/दक्षिण/पश्चिम).

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :-**

**१.** मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
**२.** मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-१

## <u>संस्थाचालकांचे प्रतिज्ञापत्र</u>

## <u>महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे</u>

## शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा मे -२०२५

**संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता :** **संस्था कोड :**

मी संस्थाचालक ------------------------------------------------------, जि. --------------------,
जी.सी.सी. परीक्षा मे - २०२५ संस्थेमधील परीक्षार्थ्यांबाबत व मशीनबाबत खालील प्रमाणे माहिती देत आहे.

| अ.क्र. | टंकलेखन मशिन संख्या | | | विद्यार्थी संख्या | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

वरील प्रमाणे मी दिलेली माहिती खरी आहे व मान्यता आणि संचालन नियम १९९१, सुधारीत नियमावली २०२३ च्या नियमावलीत व वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन आदेशातील निर्देशानुसार विद्यार्थी सदर परीक्षेत बसविण्यात आलेले आहेत. त्यामध्ये काही चूक आढळल्यास माझ्यावर कारवाई करण्यात येईल याची मला पुर्ण जाणीव आहे, तसेच काही त्रुटी आढळल्यास मी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या मार्फत घेतलेल्या जी.सी.सी. परीक्षेच्या कोणत्याही स्तरावर चौकशीला सामोरे जाण्यास तयार आहे.

**संस्थाचालक सही व शिक्का**

# <u>सर्व संस्थाचालकांनी पुढील नमुन्यात हमीपत्र सादर करावे.</u>

## <u>हमीपत्राचा नमुना</u>

मी ------------------------------------------------------------, संस्थाचालक, ------------------------------------

------------------------------------------ सादर करतो/करते की,

- आवेदनपत्रे सादर करण्यात आलेल्या सर्व परिक्षार्थीची सदर परीक्षेच्या सत्राअखेरीस किंवा परीक्षेच्या तारखेपर्यंत उपस्थिती ८० % पेक्षा कमी असल्यास त्यांची आवेदनपत्र रद्द करण्यासाठी परिषदेस कळविण्यात येईल. उपस्थिती संबंधात काही तक्रारी उदभवल्यास त्या परीक्षार्थ्याचे परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर आवेदनपत्र रद्द होईल याची मला जाणीव आहे. तसेच सदर सर्व परीक्षार्थ्यांची अर्हता व पूर्व अट पूर्तता केली असल्याची मी खात्री केली आहे.
- शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा मे - २०२५ साठी माझ्या संस्थेतून प्रविष्ठ होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे, बॅचलिस्ट व इतर कागदपत्रातून भरलेली माहिती मी स्वतः तपासून बरोबर असल्याची खात्री करून घेतली आहे.
- विद्यार्थ्यांना परीक्षेबाबतची सर्व माहिती देण्यात आली असून तद्नंतर आवेदन पत्रे व बॅच लिस्टवर स्वाक्षरी घेतली आहे. संबंधित परीक्षार्थीना त्यांची कोणती बॅच आहे याबाबत कल्पना दिलेली आहे.
- या संस्थेमार्फत प्रविष्ठ झालेले सर्व विद्यार्थी इ. १० वी उत्तीर्ण झाले आहेत व अर्हताप्राप्त आहेत.
- आवेदनपत्रे व बॅचलिस्टमध्ये तफावत असल्यास त्यामुळे विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या नुकसानीस संस्थाचालक म्हणून सर्वस्वी माझी जबाबदारी राहिल.
- सदर माहितीत यानंतर कोणताही बदल महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या पूर्व परवानगीशिवाय केला जाणार नाही, याची मला जाणीव आहे.

**तसेच उपरोक्त बाबीतील त्रुटी संदर्भात भविष्यात प्रश्न उपस्थित झाल्यास अगर तक्रार प्राप्त होऊन त्यात सत्यता आढळून आल्यास महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे जो निर्णय घेईल तो संस्थाचालक म्हणून मला मान्य राहिल.**

स्थळ :- स्वाक्षरी :-

दिनांक :- नाव :-

संस्था कोड क्र.:- टंकलेखन / लघुलेखन संस्थेचा शिक्का

**संमतीपत्र**

(परीक्षक / समीक्षक या पदांसाठी)

(नको असेल ते खोडोवे)

**प्रति,**

मा.आयुक्त

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

व्दारा, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४

मी जी.सी.सी. परीक्षा मे - २०२५ पासून पुढील परीक्षांसाठी परीक्षक / समीक्षक या पदावर काम करण्यासाठी संमती देत असून माझी माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. संपूर्ण नाव :-----------------------------------------------------------------------------------

आडनांव नांव वडीलांचे/पतीचे नांव

२. जन्म दिनांक : ------------------------------------- वय वर्षे -------------------------------------

३. संस्थेचा पत्ताः---------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

४. घरचा पत्ताः-------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------

५. आधार कार्ड क्रमांक :---------------------------------------------------------------------------

६. संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक :-------------------------------भ्रमणध्वनी क्र .--------------------------

७. शैक्षणिक पात्रताः- ---------------------------------------ई - मेल आयडी-------------------------

८. व्यावसायिक पात्रता :- (टंकलेखन व लघुलेखन परीक्षा उत्तीर्ण असल्याच्या सर्व साक्षांकित प्रती सोबत जोडणे आवश्यक आहे. कोणत्या प्रती जोडल्या आहेत ते खाली नमूद करावे.)

(१)-----------------------------------------------------------------------------------------

(२)-----------------------------------------------------------------------------------------

(३)-----------------------------------------------------------------------------------------

(४)-----------------------------------------------------------------------------------------

(५)-----------------------------------------------------------------------------------------

(६)-----------------------------------------------------------------------------------------

९. **कामाचा अनुभव :-** या परिषदेमार्फत घेतल्या गेलेल्या मागील परीक्षांसाठी परीक्षक/समीक्षक/ म्हणून काम केल्याचा अनुभव मागील किती परीक्षांच्या कामाचा अनुभव आहे ते खालील रकान्यात ( √ ) अशी खूण करून नमूद करावे.

| **परीक्षा वर्ष** | **सन २०१८** | | **सन २०१९** | | **सन २०२०** | **सन २०२१** | **सन २०२१** | **सन २०२२** | **सन २०२३** | | | **सन २०२४** | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पद** | **जाने** | **ऑगस्ट** | **फेब्रु** | **जुलै** | **जाने** | **फेब्रु.** | **ऑक्टो** | **जुलै** | **फेब्रु** | **जुलै** | **डिसें** | **जून** | **डिसें** |
| परीक्षक | | | | | | | | | | | | | |
| समीक्षक | | | | | | | | | | | | | |

वरील सर्व माहिती खरी असून प्रमाणपत्रांच्या स्व-साक्षांकित प्रती सोबत जोडत आहे. त्यामध्ये चूक आढळल्यास कारवाई केली जाईल याची माला जाणीव आहे. या संमतीपत्रकानुसार येथून पुढील सर्व परीक्षांसाठी मला परीक्षक/समीक्षक/प्रपाठ्यवाचक म्हणूनआदेश दिल्यास ते स्विकारून मी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या नियमानुसार काम करीन.

सदरचे संमतीपत्रक माझा लेखी नकार परिषदेस सादर करेपर्यंत अथवा परिषदेमार्फत पुढील संमतीपत्र मागविण्याच्या तारखेपर्यंत अंमलात राहिल.

दिनांक :

परीक्षक/समीक्षक/प्रपाठ्यवाचक सही

नांव-------------------------------------

---

## संस्थाचालकांची शिफारस

वरील संमतीपत्रात दिलेली सर्व माहिती बरोबर असून श्री./श्रीमती/कु.-----------------------------------------------------

यांना ------------------------------------------------------ या पदावर नियुक्ती दिल्यास ते योग्य रीतीने काम करतील याची मी खात्री देतो.

प्राचार्यांची स्वाक्षरी:

संस्थेचा सांकेतांक

नांव : -----------------------------------------------------------

शिक्क्यासह

संस्थेचा संपूर्ण पत्ता : ------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------

दुरध्वनी क्रमांक (एस.टी.डी. कोडसह) :

दिनांक :-

भ्रमणध्वनी क्रमांक

आधारकार्ड क्रमांक

ई-मेल आयडी

# G.C.C. (TYPING) EXAMINATION MAY - 2025

## TIME-TABLE

| | WEDNESDAY - 14/05/2025 | | | THURSDAY - 15/05/2025 | | | FRIDAY - 16/05/2025 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Time ⇩ | Batch Code | Subject Speed | Sub. Code | Batch Code | Subject Speed | Sub. Code | Batch Code | Subject Speed | Sub Code |
| 10-00 | 101 | Eng. T/W.30 | 10 | 201 | Eng. T/W.30 | 10 | 301 | Eng. T/W.30 | 10 |
| | | Eng. T/W.40 | 11 | | Eng. T/W.40 | 11 | | Eng. T/W.40 | 11 |
| | | Eng. T/W.50 | 12 | | Mar.T/W.30 | 21 | | Mar.T/W.30 | 21 |
| | | Mar.T/W.30 | 21 | | Hindi.T/W.30 | 31 | | Mar.T/W.40 | 22 |
| 12-30 | 102 | Eng. T/W.30 | 10 | 202 | Eng. T/W.30 | 10 | 302 | Eng. T/W.30 | 10 |
| | | Eng. T/W.40 | 11 | | Eng. T/W.40 | 11 | | Eng. T/W.40 | 11 |
| | | Eng. T/W.60 | 13 | | Mar.T/W.30 | 21 | | Mar.T/W.30 | 21 |
| | | Mar.T/W.30 | 21 | | HINDI T/W-40 | 32 | | ---- | ---- |
| 15-00 | 103 | Eng. T/W.30 | 10 | 203 | Eng. T/W.30 | 10 | 303 | Eng. T/W.30 | 10 |
| | | Eng. T/W.40 | 11 | | Eng. T/W.40 | 11 | | Eng. T/W.40 | 11 |
| | | Mar.T/W.30 | 21 | | Mar.T/W.30 | 21 | | Mar.T/W.30 | 21 |
| | | Mar.T/W.40 | 22 | | ---- | ---- | | ---- | ---- |